संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
उपलब्ध सुविधा
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे ● ● अंक : ११३ ● ● सोमवार दि. ११ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# मिरज ग्रामीण बसस्थानकाच्या आधुनिकीकरणामुळे वैभवात भर : डॉ. सुरेश खाडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : मिरज ग्रामीण बसस्थानकाच्या आधुनिकीकरणासाठी १९ कोटी ५० लाख रूपये इतका निधी देण्यात आला आहे. यामधून सुसज्ज, देखणे व मिरज शहराच्या वैभवात भर पडेल असे सर्व सोयी सुविधायुक्त मिरज ग्रामीण बसस्थानक तयार होईल, असे प्रतिपादन कामगार मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या मिरज (ग्रामीण) बसस्थानक बांधकामाचे भुमिपूजन व कोनशिला अनावरण पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार संजय पाटील, महानगरपालिका आयुक्त सुनील पवार, उपविभागीय अधिकारी मिरज उत्तम दिघे, माजी महापौर संगीता खोत, परिवहन मंडळाचे विभाग नियंत्रक सुनिल भोकरे, विभागीय वाहतूक अधिकारी वृषाली भोसले, विभागीय अभियंता सुशांत पाटील, मिरज आगार व्यवस्थापक श्रीमती किरगत, धनंजय कुलकर्णी, विठ्ठल खोत, उमेश हारगे आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, मिरज ग्रामीण बसस्थानकाची १९८३ साली स्थापना झाली होती. यामध्ये १५ फलाट व इतर सोयी सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. परंतु ग्रामीण भागातून पूरक रेल्वे सेवा मिरज शहरामध्ये जोडली गेली असल्याने तसेच मिरज शहर हे वैद्यकीय क्षेत्रात नावाजलेले असल्यामुळे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून तसेच कर्नाटकमधूनही प्रवाशांची ये-जा मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे सद्याचे मिरज ग्रामीण बसस्थानक अपुरे पडत आहे. कर्मचारी, प्रवाशी यांनाही अडचण होत आहे. त्यासाठी या बसस्थानकाचे आधुनिकीकरण करणे आवश्यक होते. मिरज शहर व ग्रामीण बसस्थानकाच्या आधुनिकीकरणासाठी सुमारे ३७ कोटीची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. यामध्ये मिरज ग्रामीण बसस्थानकासाठी १९ कोटी ५० लाख रूपये इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळाली आली असून त्याच्या कामाची सुरवात करण्यात येत आहे. मिरज येथील शहरी बस स्थानकही लवकरच सुसज्ज करण्यात येईल.



**मिरज : येथे बसस्थानकाच्या बांधकामाचे भुमिपूजन करताना पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे व याप्रसंगी उपस्थित खास. संजयकाका पाटील व मान्यवर**

बसस्थानकाचे तात्काळ काम सुरू करण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी यावेळी संबधितांना दिले. तसेचन काम सुरू असताना प्रवाशांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना देवून यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. मिरज ग्रामीण नव्याने बांधण्यात येणाऱ्या मिरज ग्रामीण बसस्थानकामध्ये तळमजला व पहिला मजला असे एकूण १ हजार ९६५ चौ.मी. चे बांधीव क्षेत्रफळ आहे. यामध्ये तळमजल्यात १८ फलाट, सुलभ शौचालय, प्रतिक्षालय, वाहतूक निरीक्षक, पार्सल ऑफीस, जेनेरिक मेडिकल, आरक्षण, हिरकणी कक्ष, आगार व्यवस्थापक कक्ष, महिला विश्रांतीगृह, उपहारगृह, दुकान गाळे इत्यादीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. पहिल्या मजल्यामध्ये चालक-वाहक विश्रांतीगृह, लेखा शाखा, तिकीट व रोकड शाखा, प्रसाधनगृह तसेच पाणीपुरवठा व्यवस्था, विद्युत काम, फायर फायटींग, ट्रीमिक्स पेव्हमेंट, पेव्हर ब्लॉक पार्किंगकरिता, आर.सी.सी. स्ट्रॉम वॉटर ड्रेन, संरक्षक भिंत, लँडस्केप, रेन वॉटर हार्वेस्टिंग इत्यादी कामे करण्यात येणार आहेत. या कामाची अंदाजित रक्कम १३ कोटी ९६ लाख ९५ हजार ७९७ रूपये इतकी असल्याचे यावेळी सांगितले.

प्रास्ताविकात परिवहन महामंडळाचे विभागीय अभियंता सुशांत पाटील यांनी बसस्थानकाबाबतची सविस्तर माहिती दिली. प्रतिदिन प्रवासी संख्या सुमारे २५ हजार इतकी आहे. त्यामुळे सध्याच्या सोयी सुविधा अपुऱ्या पडत असल्यामुळे आधुनिकीकरण गरजेचे होते. त्यासाठी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या पाठपुरावा व विशेष प्रयत्नांमुळे सर्व सोयी सुविधायुक्त मिरज ग्रामीण बसस्थानकाचे नव्याने बांधकाम होत असल्याचे ते म्हणाले. आभार विभाग नियंत्रक सुनिल भोकरे यांनी मानले. कार्यक्रमास परिवहन महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, प्रवासी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. प्रशांत पवार यांची निवड



**पंढरपूर : डॉ. प्रशांत पवार यांचा सत्कार करताना स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे सोबत प्रा.पी.आर. कुलकर्णी व स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार.**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठातापदी व व्यवस्थापन परिषदेच्या (मॅनेंजमेंट कौन्सिल) सदस्यपदी गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या डॉ.प्रशांत मारुती पवार यांची नियुक्ती कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर यांनी केली. डॉ.प्रशांत पवार यांना एकाचवेळी दुहेरी मुकुट मिळाल्यामुळे स्वेरीच्या वतीने स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यात संशोधनाचे वारे खऱ्या अर्थाने स्वेरीत होणाऱ्या नियमितच्या संशोधन प्रकल्पांमुळे वाहू लागले. त्यानंतर जिल्ह्यातील संशोधन प्रक्रिया अधिक गतिमान झाल्या. त्यामुळे जिल्ह्यात अल्पावधीत 'संशोधन आणि स्वेरी' असे एक समीकरण बनले. ग्रामीण भागातील एक युवा शास्त्रज्ञ म्हणून नावारुपास आलेल्या डॉ.प्रशांत पवार यांचा शैक्षणिक प्रवास पाहिला तर संशोधनातील त्यांची झेप समजून येईल. डॉ. प्रशांत पवार यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मधून सन २००० साली सिव्हील इंजिनिअरिंगची पदवी संपादित केली. त्यानंतर गुवाहाटी मधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी (आयआयटी) येथून एम.टेक.ही पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर देशाच्या अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या इंडियन इन्सिटट्युट ऑफ सायन्स (आयआयएससी), बेंगलोर येथून 'हेलिकॉप्टर' या विषयावर त्यांनी पीएच.डी. पूर्ण केली. त्यांच्या पीएच.डी. करीता त्यांना गोल्ड मेडलही मिळालेले होते. पुढे कोन्कुक विद्यापीठ, सेऊल (दक्षिण कोरीया) येथून त्यांनी पोस्ट डॉक्टरेटही पूर्ण केली. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील मागील १६ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी संशोधन अधिष्ठाता, शैक्षणिक अधिष्ठाता व सिव्हील इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख अशा विविध पदांवर कार्य केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद व संशोधन मंडळाच्या सदस्यपदी निवड झाल्यामुळे डॉ. पवार यांचे स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनिफ शेख, इतर पदाधिकारी, विश्वस्त, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, संस्थेअंतर्गत असणाऱ्या बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले असून त्यांच्या निवडीमुळे सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# लोकसभेसाठी दीड हजार अर्ज भरणार : महादेव साळुंखे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : लोकसभेच्या निवडणुका बॅलेट पेपरवरच घेतल्या जाव्यात अशी आमची मागणी आहे. पण हम करेसो कायदा या मानसिकतेत असणाऱ्या भाजप सरकारकडून आमची मागणी मान्य होण्याची शक्यता नाही. त्यामुळे निवडणुकीत प्रत्येक गावातून दोन उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मराठा स्वराज्य संघाचे अध्यक्ष महादेव साळुंखे यांनी दिली.

लोकसभेसह विधानसभा व अन्य सर्व निवडणुका ईव्हीएमवर न घेता बॅलेट पेपरवरच घ्याव्यात यासाठी मराठा स्वराज्य संघ पाठपुरावा करत आहे. सांगलीत पत्रकार बैठकीत साळुंखे म्हणाले, ईव्हीएममधून मतदान फिरवता येते हे सिद्ध झालेले नसले, तरी देशभरातून त्याला विरोध होत आहे. जपान, अमेरिका फ्रान्ससारख्या प्रगत देशांतही ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवरच निवडणुका घेतल्या जातात. भारतात ईव्हीएमच्या माध्यमातूनच भाजपने आतापर्यंत दोनवेळा बहुमत मिळविले यात शंका नाही. ईव्हीएमविरोधात विविध न्यायालयांत याचिका दाखल झाल्या आहेत, पण त्यांचा निकाल लोकसभा निवडणुकीपूर्वी लागण्याची शक्यता नाही. या पार्श्वभूमीवर आम्हीच ईव्हीएमच्या बंदोबस्तासाठी पुढाकार घेतला आहे.

साळुंखे म्हणाले, सांगली जिल्ह्यातील ७०० गावांतून प्रत्येकी दोन उमेदवार निवडणूक अर्ज भरणार आहेत. त्याशिवाय सांगली, मिरज शहरे व अन्य नगरपालिका क्षेत्रांतूनही मोठ्या संख्येने उमेदवार अर्ज भरतील. जिल्हाभरातून सुमारे १५०० अर्ज भरले जाणार आहेत. ईव्हीएमची क्षमता ३८५ उमेदवारांची आहे. त्यामुळे निवडणूक बॅलेट पेपरवरच घेणे आयोगाला भाग पडेल. याकामी सकल मराठा क्रांती मोर्चासह समविचारी संघटनांचीही मदत घेणार आहोत.

यावेळी जिल्हाध्यक्ष ड. रणधीर कदम, प्रवक्ते संतोष पाटील, डॉ. महेश भोसले, सतीश जाधव, अण्णा कुरळपकर, सुधीर चव्हाण, सतीश पाटील, सुनील दळवी, सर्जेराव पाटील पंडित पाटील आदी उपस्थित होते. संघटनेच्या जत तालुकाध्यक्षपदी ड. सिद्धू अण्णाप्पा महाडिक यांची निवड यावेळी जाहीर करण्यात आली.

# सांगली लोकसभा पूर्ण ताकदीने लढविणार : विशाल पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : सांगली जिल्हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. याठिकाणी आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीला पोषक वातावरण आहे. त्यादृष्टीने आम्ही निवडणुकीची जय्यत तयारी केलेली असून काँग्रेससह मित्रपक्ष एकदिलाने व पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार आहे. येथील उमेदवारीबाबत पक्षाचे वरिष्ठ जो निर्णय देतील, त्यानुसार आम्ही काम करू, असे काँग्रेसचे नेते विशाल पाटील यांनी स्पष्ट केले.



**विशाल पाटील**


वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या (व्हीएसआय) नियमित बैठकीसाठी ते रविवारी (दि.१०) पुणे येथे गेले होते. त्यावेळी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. सांगली लोकसभेची जागा मागील दोन पंचवार्षिकला काही अडचणीमुळे आमच्या हातून गेली. मात्र, आता ही जागा पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. काँग्रेस आणि काँग्रेसचे मित्रपक्ष एकदिलाने या जागेसाठी लढणार आहेत. मी स्वतः मतदारसंघात पायाला भिंगरी लावून फिरत आहे. यंदाची लोकसभा पूर्ण क्षमतेने, पूर्ण ताकदीने लढविणार असल्याचे ते म्हणाले.

# म्हसवड मध्ये हजारो भाविकांनी घेतले स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, विदर्भ,मराठवाडा आदी राज्यातील लाखो भाविकांचे कुलदैवत व म्हसवडचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्दनाथ मंदिरातील भुयारात असलेल्या स्वयंभू शिवलिंगाचे महाशिवरात्रीच्या रात्री सुमारे सत्तर हजार भाविकांनी रांगेतून दर्शन घेण्याचा लाभ घेतला. हे भुयार वर्षातून एकदाच भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात येते.येथील श्री सिध्दनाथ मंदिरातील भुयारात एक स्वयंभू शिवलिंग आहे.ते वर्षभर बंद अवस्थेत असते.वर्षातून फक्त एक वेळ, तेही महाशिवरात्रीच्या रात्री रात्रभर तमाम भाविकांच्या दर्शनासाठी खुले ठेवण्यात येते. दर्शन रांगेतून सुमारे सत्तर हजार भाविकांनी या स्वयंभू शिवलिंगाच्या दर्शनाचा लाभ घेतला.

दरम्यान, चालू वर्षी या भुयारात एक सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसवून हत्ती मंडपातील मोठ्या स्क्रिनवर भुयारातील स्वयंभू शिवलिंगाचे दर्शनाचा लाभ हृदय विकार, शुगर, अपंग, ऑपरेशन झालेले, दहा वर्षाच्या आतील मुले, गरोदर महिला तसेच ज्यांना दम्याचा आजार आहे आणि वयोवृद्ध महिला,पुरूष अशा तमाम भाविकांना भुयारात न जाता स्यावयंभू शिवलिंगाच्वाया दर्शनाचा लाभ बाहेर बसून घेता आला. यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी देवस्थान ट्रस्ट व पोलिस स्टेशन यांचेकडून भाविकांच्या सोयीसुविधांसाठी सर्व प्रकारे खबरदारी घेण्यात आली.



**१) भुयारात वर्षभर बंद असणारे स्वयंभू शिवलिंग २) भुयारात न उतरता येणाऱ्यांना मोठ्या स्क्रीनवर भुयारातील स्वयंभु शिवलिग़ाच्या दर्शनाचा मनसोक्त आनंद घेतला**

# माता बाल संगोपन रूग्णालयांमुळे गोरगरीब जनतेला आधार मिळेल : डॉ. सुरेश खाडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : जिल्हा रूग्णालय व माता बाल संगोपन या सांगली येथे नविन बांधण्यात येणाऱ्या रूग्णालयांच्या माध्यमातून येत्या वर्षभरात आरोग्याच्या चांगल्या सुविधा निर्माण होतील. आरोग्य पंढरीला साजेशा अशा सोयी सुविधा या रूग्णालयांच्या माध्यमातून मिळतील. गोरगरीब जनता शासकीय हॉस्पीटलमध्ये येते. त्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्नशील असून या रूग्णालयांच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला आधार मिळेल, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी केले.

पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रूग्णालय आवार सांगली येथे जिल्हा रूग्णालय सांगली व माता बाल संगोपन रूग्णालय या १०० खाटांच्या दोन नुतन रूग्णालयांचे भुमीपूजन व कोनशिला अनावरण पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार संजय पाटील, आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम, माजी आमदार दिनकर पाटील, माजी आमदार नितीन शिंदे, निता केळकर, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बी. सारंगकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मिरजकर, माजी महापौर संगीता खोत यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रूग्णालय आवार सांगली येथे बांधण्यात येणाऱ्या १०० खाटांच्या जिल्हा रूग्णालयासाठी ४६ कोटी रूपये व माता बाल संगोपन रूग्णालयासाठी ३६ कोटी रूपये अशा एकूण ८२ कोटी रूपयांचया रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मिरज येथेही नर्सिंग कॉलेज व १०० बेडचे माता बाल संगोपन रूग्णालय होत आहे. मिरज येथे मल्टीपर्पज हॉस्पीटल सुरू करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. यामुळे सांगली जिल्ह्यातील नागरिकांना आरोग्याच्या मोठ्या सोयी सुविधा उपलब्ध होतील. आरोग्य, शिक्षण, पाणी व्यवस्था, ग्रामीण भागात आरोग्याच्या सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शासकीय रूग्णालयातून गोरगरीब जनतेला सर्व औषधे मिळावीत यासाठी डीपीडीसीमधून निधी देवू, असे ते यावेळी म्हणाले.

खासदार संजय पाटील म्हणाले, मिरज व सांगली ही वैद्यकीय नगरी म्हणून प्रसिध्द आहे. सांगली येथे होणाऱ्या १०० बेडच्या नविन दोन रूग्णालयांचा गोरगरीब जनतेला लाभ होईल. या रूग्णालयांच्या माध्यमातून रूग्णांची सेवा व्हावी, त्यांना दिलासा मिळावा. या रूग्णालयांचे काम लवकर पूर्ण करावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

आमदार सुधीर गाडगीळ म्हणाले, जिल्हा रूग्णालय सांगली व माता बाल संगोपन रूग्णालय या १०० खाटांच्या दोन रूग्णालय सांगली येथे होण्यासाठी २०१७ पासून पाठपुरावा व प्रयत्न सुरू केले होते. या रूग्णालयांमुळे एक चांगली सुविधा निर्माण होईल. काहीवेळा रूग्णांना बाहेरून औषधे आणावी लागतात, हा प्रश्नही सोडविण्यासाठी प्रयत्न करावा, असे ते यावेळी म्हणाले.

प्रास्ताविकात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांनी पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रूग्णालय आवार सांगली येथे जिल्हा रूग्णालय सांगली व माता बाल संगोपन रूग्णालय या १०० खाटांच्या दोन नुतन रूग्णालयांमुळे अत्याधुनिक सोयी सुविधा उपलब्ध होतील. सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया, सर्व सोयीयुक्त हॉस्पीटल सुरू झाल्यामुळे एक सक्षम आरोग्य व्यवस्था निर्माण होईल व गोरगरीब जनतेला चांगली आरोग्य सेवा मिळेल. जिल्ह्यातील




**सांगली : येथे नुतन रूग्णालयांचे भुमीपूजन व कोनशिला अनावरण पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थित खासदार संजय पाटील, आमदार सुधीर गाडगीळ व उपस्थित मान्यवर**

आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणाचा आलेख उंचावण्याचा प्रयत्न करू, असे ते यावेळी म्हणाले. आभार डॉ. प्रमोद चौधरी यांनी मानले. कार्यक्रमास आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## * संपादकीय *

# नस्ती उठाठेव कशाला?

काही काळापूर्वी एखाद्या विवाहित स्त्रीला काहीही विचारले, तरी 'आमच्या ह्यांना विचारून सांगते', असे उत्तर येत असे. साध्या भाजीखरेदीपासून ते अगदी घर किंवा सोन्याच्या खरेदीपर्यंत कशालाही हेच उत्तर दिले जायचे. अगदी स्वयंपाकाची भांडी खरेदी करायला गेल्यावरही ज्या भांड्याला नवऱ्याचा स्वयंपाकघराशी कधी हातही लागणार नसे, त्या भांड्यावरही स्त्रिया आवर्जून नवऱ्याचेच नाव घालत. एवढेच नाही, तर मालक, धनी, साहेब अशा वर्चस्ववाचक शब्दांनीच नवऱ्याचा उल्लेख केला जात असे. हा काळ मागे सरला, आता स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून उभी आहे, तिचे आणि तिच्या नवऱ्याचे सहजीवन बरोबरीच्या पायावर उभे आहे, असे तुम्हाला वाटत असेल तर ते साफ चूक आहे. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे यांनी आपल्या अथक परिश्रमातून चिखलात रुतलेला स्त्रीजीवनाचा जो गाडा बाहेर काढला, तो पुन्हा त्याच चिखलात ढकलण्याचे, काळाची चाके पुन्हा उलटी फिरवण्याचे प्रयत्न अगदी थेट सरकारी पातळीवरून सुरू आहेत, असे म्हणणे किंचितही अतिशयोक्तीचे होणार नाही असे चित्र आहे. झाले आहे असे की गृहनिर्माण आणि शहर व्यवहार मंत्रालयाने घटस्फोटित स्त्रीला सासरचे नाव बदलून माहेरचे नाव लावायचे असेल, तर घटस्फोटाची कागदपत्रे सादर करावी लागतील किंवा नवऱ्याकडून ना हरकत प्रमाणपत्र द्यावे लागेल, अशी अधिसूचना काढली. ही अधिसूचना नाव बदलण्याच्या आपल्या अधिकाराच्या स्वातंत्र्याविरोधात आहे, असे म्हणत दिव्या मोदी-टोंग्या यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. दिल्ली उच्च न्यायालयाने हा असला अजागळ निर्णय रद्द न करता या मुद्द्यावर केंद्र सरकारचे मत मागितले. एक सरकारी यंत्रणा मध्ययुगाकडे जाणारी एक अधिसूचना काढते, त्यावर मत मागवणे एकवेळ, चाकोरीबद्ध न्यायालयीन कार्यपद्धतीचा भाग म्हणून आश्चर्याचे ठरणार नाही. पण अजब म्हणजे या सगळ्यात कुणालाही हे सगळे जिच्याबद्दल सुरू आहे, त्या स्त्रीचे मत विचारणे वा विचारात घेणे आवश्यक वाटत नाही.

विवाहानंतर स्त्रीने नाव बदलून पतीचे नाव आणि आडनाव लावणे ही जगभरात बहुतांश ठिकाणी प्रचलित असलेली पद्धत. स्त्रियांना जसजशी आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली, स्वभान येऊ लागले, तसतसे त्या प्रश्न विचारू लागल्या. लग्न झाल्यावर वडिलांचे नाव काढून त्या जागी पतीचे नाव का लावायचे, जिने नऊ महिने पोटात वागवले, जोजवले, वाढवले, खस्ता खाल्ल्या, त्या आईच्या नावाचा कुणाही व्यक्तीच्या नावांत समावेश का नाही, मुळात लग्न झाल्यानंतर स्त्रीने आपले नाव का बदलायचे असे मुद्दे उपस्थित होऊ लागले. एकेकाळी साताठ वर्षांचे वय झाले की विवाह होत. त्यामुळे नाव बदलणे आणि बदललेले नाव स्वीकारणे ही गोष्ट फार त्रासदायक होत नसे. पण आता विशी-पंचविशीनंतर मुली विवाह करतात. एवढ्या काळात वाढलेली, फुललेली स्वतःची ओळख निव्वळ विवाह झाला म्हणून पुसून टाकायची हे स्वीकारणे त्यांना जड जातेच, शिवाय पुरुषाच्या आयुष्यात लग्नामुळे कोणताही बाह्य बदल होत नाही, ना त्याला नाव बदलावे लागते, ना मंगळसूत्रासारखा एखादा दागिना घालावा लागतो, मग मीच हे बदल का करायचे हे प्रश्न त्या विचारू लागल्या. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे नवरा आपला मालक किंवा धनी नाही, तर तो सहजीवनामधला जोडीदार आहे, सुखदुःखामधला भागीदार आहे, या मानसिकतेपर्यंत त्या पोहोचल्या आहेत. त्या अर्थार्जन करतात, त्याच्या बरोबरीने उभ्या राहून संसाराचा गाडा हाकतात. किंबहुना कधीकधी त्याच्याहून कांकणभर अधिकच जबाबदारी अंगावर घेतात आणि ती निभावतात. सर्वच स्त्रियांच्या बाबतीत सरसकटपणे हे घडत नसले तरी शहरी भागात शिक्षण, अर्थार्जन, त्यातून मिळणारे स्वातंत्र्य या सगळ्यामधला मोकळेपणा स्त्रीच्या जीवनात दिसू लागला आहे. लग्न करायचे की नाही, कुणाशी करायचे, कधी करायचे, मुले हवीत की नकोत, किती व्हावीत, कधी व्हावीत, त्यांना कसे वाढवायचे या सगळ्यासंदर्भात त्यांना स्वतःची मते असतात आणि ती व्यक्त करायला आणि राबवायला त्या जराही संकोचत नाहीत. वेगवेगळे राजकीय पक्ष जिचा उल्लेख करतात ती नारी शक्ती स्त्रियांच्या या स्वातंत्र्यापेक्षा, मोकळेपणाने जगण्यापेक्षा वेगळी असते का?

नाही ना? मग स्त्रीने आपल्या नावाचे काय करायचे याची उठाठेव सरकारने का करावी ? शिवाय कुणालाही आपले नाव बदलायचे असेल तर राजपत्र- गॅझेट- ही व्यवस्था आधीपासून प्रचलित आहे. ती सोडून एकतर घटस्फोटाची प्रत द्या किंवा पतीचे नाव काढून माहेरचे नाव लावण्यासाठी नवऱ्याकडून ना हरकत प्रमाणपत्र आणा हा आचरटपणा कशासाठी? आधीच विवाहानंतर माहेरचे नाव न बदलता तसेच ठेवणाऱ्या स्त्रियांना कशाकशाला तोंड द्यावे लागते याची या यंत्रणांना जाणीव आहे का? अगदी अलीकडे परिस्थिती किंचित बदलली असली तरी याआधीच्या पिढीतील लग्नानंतर नाव न बदललेल्या स्त्रियांनी रेशन कार्ड, बँक, पासपोर्ट, आधार या सरकारी कागदपत्रांवर आपले नाव बदलले जाऊ नये, तसेच राहावे यासाठी या यंत्रणांचे उंबरठे झिजवले आहेत. कितीही समजावून सांगितले तरी आपल्यासमोर बसलेली विवाहिता विवाहानंतर नाव का बदलत नाही, हे तिथल्या बथ्थड बाबूलोकांच्या डोक्यात शिरत नसे हा त्यांचा अनुभव आहे. रेशन कार्डावर कुटुंबप्रमुख म्हणून स्त्रीचे नाव असणे किंवा कोणत्याही सरकारी दस्तावेजात तिने माहेरच्या नावानेच कागदोपत्री वावरणे हा त्यांच्या लेखी या 'स्त्रीमुक्तीवाल्या बायां'कडून बिचाऱ्या पुरुषावर घोर अन्याय होता. काळाच्या रेट्याने ही परिस्थिती थोडीशी का होईना बदलली आहे. आज स्त्रियांना लग्नानंतर नाव न बदलण्यासाठी पूर्वीइतका संघर्ष करावा लागत नाही. एखादी नाव बदलणार नाही, तेच नाव ठेवेल हे स्वीकारले जाते. असे करणारीकडे 'स्त्रीमुक्तीवाली बाई' म्हणून हेटाळणीपूर्वक बघितले जात नाही. पुरुषप्रधानतेची अवजड दारे थोडी किलकिली झाली आहेत. आपल्या खांद्यावरचे पुरुषप्रधानतेचे ओझे बाजूला ठेवून मोजके का होईना पुरुष स्त्रीवादी विचार निदान समजून घेऊ लागले आहेत. एखादा दुसरा तो आचरणातही आणू पाहतो आहे. नवी पिढी नेहमीच अधिक मोकळेपणा घेऊन येते, नवी क्षितिजे धुंडाळू पाहते. नवा विचार तिला खुणावत असतो. काही पुरुष आपल्या नावात वडिलांच्या आधी आईचे नाव लावताना दिसतात, ते यामधूनच. व्यक्ती म्हणून स्त्रीला तिचा तिचा अवकाश आहे, आणि तो तिने घ्यावा ही धारणा असलेल्या पुरुषांची संख्या वाढताना दिसते आहे. आपण स्त्रीचे मालक नाही, ती आपली मालमत्ता वा संपत्ती नाही, तिला कोणत्याच गोष्टीसाठी आपल्या परवानगीची गरज नाही, हे त्यांना हळूहळू का होईना स्वीकारता येऊ लागले आहे. स्त्रीपुरुष या नात्यात जसे आनंदाचे क्षण येतात तसेच ताणतणाव, बेबनाव, कटुताही येऊ शकते. पण त्या प्रसंगांना त्यांनी आपापल्या पद्धतीने हाताळावे हे उत्तम. त्यातही स्त्रीने आपले नाव काय ठेवायचे, ते बदलायचे की नाही, या जुन्या झालेल्या मुद्द्यांमध्ये सरकारी यंत्रणांनी कशाला नाक खुपसावे? आपण आता मध्ययुगात जगत नाही पुरुष हा स्त्रीचा मालक नाही आणि स्त्री ही त्याची गुलाम नाही ही दोन भिन्नलिंगी माणसे त्यांना हवे ते करण्यास मुखत्यार आहेत, हे अद्यापही या यंत्रणांच्या पचनी पडत नाही, हे महिला दिन वगैरे साजरा झाल्यानंतरचे वास्तव.

# दोन दशकांचे वर्तुळ!

भाजप आगामी लोकसभा निवडणुकीतील विजयाचा अती म्हणावा, इतका आत्मविश्वास व्यक्त करत आहे, त्यावरून अनेकांना सन २००४ च्या निवडणुकीची आठवण होत आहे. देश चालवणे, या मुद्द्यावर मोदींना हटवल्यास पर्याय कसा असेल; याची शंका जनमनात कायम दिसते.

नरेंद्र मोदी-अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष आगामी लोकसभा निवडणुकीतील विजयाचा अती म्हणावा इतका आत्मविश्वास ज्या प्रकारे व्यक्त करत आहे; त्यावरून अनेकांना सध्या दोन दशकांपूर्वीच्या निवडणुकीचा आठव होत आहे. सन २००४ मध्ये अटलबिहारी वाजपेयी आणि आत्मविश्वासाने ठासून भरलेल्या भाजपचा पराभव होईल, अशी कोणालाच अपेक्षा नव्हती. अर्थात, भाजपचा २०२४ मध्येही पराभव होईल, अशी अपेक्षा सध्या कोणी करत नाही. तरीही भारतीय राजकारणात काहीही शक्य आहे. सरकारी कर्मचारी, गृहिणी, गॅस ग्राहक इत्यादी इत्यादींना खूष करण्याची मालिका सुरू असली तरी महाराष्ट्र-बिहार वगळून हिंदी पट्ट्यातही वर्तमान सरकारच्या कामकाज पद्धतीच्या विरोधात जनमानसात अंडरकरंट आहे; असे काहींना वाटते. 'टीम मोदी' ही 'टीम वाजपेयी'पेक्षा सर्वांगाने वेगळी आहे व राजकीय समीकरणेही आता बदलली आहेत; हे ध्यानात घेतले जात नाही.

मुळात या दोन दशकांत भारताच्या आर्थिक-सामाजिक गणितांत व राजकीय रंगमंचावरही मोठे बदल झाले आहेत. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठापनेनंतर लाखोलाखोंचे जथे अयोध्येत नेणारा भाजप यावेळेसही विकासाच्या शुगर कोटेड वेष्टनात हिंदुत्वाधारित राष्ट्रवादाची गोळीच मतदारांना देण्यास सज्ज झाला आहे. मात्र, गेल्या दशकात मोदी-शहा यांनी पक्ष संघटनेत कोठेही 'फट' म्हणून ठेवायचीच नाही, या पद्धतीने भाजपची जी बांधणी आवळली आहे; ती विरोध करणारे लक्षात घेत नाहीत किंवा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. २००४ प्रमाणे आताचा भाजप आघाड्यांसाठी फारसा हतबल नाही. सुनियोजित प्रचार हा भाजपचा 'यूएसपी' होताच. पण आता समाज माध्यम नावाचे शस्त्र भाजपने विरोधकांच्या तुलनेत चांगलेच धारदार केले असून 'क्रिएट ऑन इंडिया'सारखी नवनवीन आयुधे त्यात जोडली जात आहेत.

त्यावेळी एक से एक दिग्गज नेत्यांनी राष्ट्रीय राजकारणाचे नभांगण अक्षरशः झळाळत होते. अटल-अडवानी, प्रमोद महाजन, मुलायमसिंह व लालूप्रसाद, चौताला, ज्योती बसू, हरकिशनसिंग सुरजित, इंद्रजित गुप्ता, शरद पवार... कितीतरी नावे सांगता येतील. आता काय चित्र दिसते? मोदी-शहा यांच्यासमोर सोनिया-राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, पवार, सीताराम येचुरी आदी मोजकीच नावे देशभरात प्रभावी दिसतात. ममता बॅनर्जी, स्टॅलिन, केजरीवाल व अखिलेश यादव यांना देशापेक्षा राज्यांची चिंता जास्त. (यात राहुल गांधींचे नाव टाकले नाही तर काँग्रेसपेक्षा भाजप कार्यकर्तेच जास्त चिडतील!) भाजपला दक्षिणेत फारसे स्थान नसते हे खोटे ठरविण्यासाठी मोदींचा त्या राज्यांकडील झंझावात सध्या सुरू आहे.

त्यावेळी रामविलास पासवान यांच्यासारखे नेते भाजपपासून दूर गेले होते व आज नितीशकुमारांच्या पाठोपाठ चंद्राबाबू, नवीन पटनाईक हेही भाजपकडे वळत आहेत. अनेक प्रादेशिक पक्षनेते अस्तित्वाच्या काळजीनेही भाजपकडे येत आहेत. त्यावेळी भाजप (१३८) लोकसभेत काँग्रेसपेक्षा (१४५) फक्त सात जागा मागे होता आणि त्या पिछाडीचे एक मुख्य कारण महानगरे व शहरी भागांत मतदानाची टक्केवारीच घसरली होती. यंदा तसे होणार नाही व शहरी मतदार मतदान करेपर्यंत घरात स्वस्थ बसणार नाही किंवा सहलीला जाणार नाही यादृष्टीने भाजपने गेल्या कित्येक महिन्यांपासून प्रत्येक बूथ मजबूत करण्याकडे बारकाईने लक्ष दिले आहे.

'उमेदवार कोणीही असो, तुमचे मत मोदींना व मोदींनाच जाणार,' हा भाजपचा स्पष्ट संदेश आहे. महागाईसारख्या




सामान्यांना भिडणाऱ्या मुद्द्याची दाहकता कायम असताना वर्षांमागून वर्षे मोफत देत गेल्याने दीर्घकाळात अर्थव्यवस्था संकटात शकते, या शक्यतेचा भारतीय मतदारांवर काही परिणाम होत नाही. राज्य पातळीवर अनेक ठिकाणी स्पष्ट पर्याय असले तरी देश चालवणे, या मुद्द्यावर मोदींना सत्तेवरून हटवल्यास समोर असलेला पर्याय कसा असेल; याची शंका जनमनात कायम दिसते. याची जाणीव उद्धटपणे बोलणाऱ्या आणि वागणाऱ्या भाजपच्या अनेक नेत्यांना व त्यापेक्षा त्यांचे ओएसडी-पीए मंडळींनाही आहे.

सन २००४ च्या तुलनेत आज प्रचंड बदललेल्या नॅरेटिव्हमध्ये (राजकीय कथन) लोकच सरकारच्या स्थैर्याचा मुद्दा मांडत आहेत. तेव्हा गुजरात दंगलींचा विषय काढून विरोधकांनी भाजपला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. मात्र, आज नरेंद्र मोदी-अमित शहा हेच आज देशाच्या जनतेचा विश्वास वारंवार मिळवण्यात इतके यशस्वी ठरतात; हा काव्यात्म न्याय म्हणावा लागेल.

ता. क. - 'इंदिरा इज इंडिया' या १९७५ मधल्या घोषणेवरून भाजपनेते काँग्रेसवर वर्षानुवर्षे सडकून टीका करत आले. तेव्हा देवकांत बारुआंसारखे नेते इंदिरा गांधींची आरती ओवाळत होते. आता तर प्रगती मैदानावर राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत 'मैं भारत हूं' अशी जी पोस्टर्स झळकत होती; त्यातला संदेश नेमके काय सांगतो?

# पुणे बनतंय उद्योगांचे शहर, जिल्ह्यात ४.५ लाख 'एमएसएमई'ची नोंदणी

### पुणे जिल्ह्यातील 'एमएसएमईं'ची संख्या

निर्मिती क्षेत्रातील नोंदणी झालेल्या एमएसएमई : एक लाख
सेवा क्षेत्रातील एमएसएमई : साडेतीन लाख
एकूण एमएसएमई : साडेचार लाख

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : आयटी, ऑटोमोबाइल उद्योगक्षेत्रांची पंढरी समजला जाणारा पुणे जिल्हा आता सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचा (एमएसएमई) जिल्हा म्हणूनही ओळखला जाणार आहे. पुण्यात सुमारे साडेचार लाख 'एमएसएमईं'ची उद्यम नोंदणी झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले असून, यापैकी एक लाख 'एमएसएमई' निर्मिती क्षेत्रात आणि उर्वरित साडेतीन लाख 'एमएसएमई' सेवा क्षेत्रात कार्यरत असल्याचे उद्योग विभागाकडून सांगण्यात आले आहे.



पुणे जिल्ह्याचा विचार केल्यास पुणे शहर, पिंपरी-चिंचवड ही शहरे आणि जिल्ह्यातील इतर तालुक्यांत साडे चारलाख 'एमएसएमईं'नी उद्यम नोंदणी केली आहे. एका उद्योजकाचे अनेक व्यवसाय असले, तरी त्याला एकदाच उद्यम नोंदणी करता येत असल्याने जिल्ह्यातील व्यवसायांची संख्या यापेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे. निर्मिती क्षेत्राचा विचार केल्यास ऑटो स्पेअर पार्ट्स, कंपोनंट्स, हार्डवेअर, मशिन, फार्मास्युटिकल्स, फूड प्रोसेसिंग, स्टील या उद्योगांतही मोठ्या प्रमाणावर निर्मिती केली जात आहे. अलीकडे संरक्षण क्षेत्राला लागणारी विविध सामग्री, यंत्रणा, स्पेअरपार्ट्स, कंपोनंट लक्षात घेता त्यांचीही निर्मिती लक्षणीय वाढली आहे. लॉजिस्टिकपासून वेअर हाउसिंग, स्टोरेज, ट्रान्सपोर्ट आणि निर्यात अशा विविध प्रकारच्या सेवा पुरवणारे छोटे-मोठे साडेतीन लाख उद्योग जिल्ह्यात कार्यरत आहेत.

नुकत्याच एका कार्यक्रमात राज्याच्या उद्योग विभागाचे पुणे विभागीय अतिरिक्त संचालक एस. जी. राजपूत यांनी ही आकडेवारी प्रसिद्ध केली असून, पुणे जिल्हा 'एमएसएमईं'च्या बाबतीत राज्यात मोठ्या प्रमाणावर प्रगती करीत असल्याचे राजपूत यांनी स्पष्ट केले आहे. या सर्व 'एमएसएमईं'द्वारे २५ लाखांहून अधिक व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाल्याचीही आकडेवारी समोर आली आहे. केवळ 'एमएसएमई' नाही, तर निर्यात क्षेत्रातही पुणे जिल्हा देशातील सर्वाधिक निर्यात करणाऱ्या काही जिल्ह्यांपैकी एक असल्याचे राजपूत यांनी सांगितले आहे.

### या क्षेत्रात निर्यात सर्वाधिक

पुणे जिल्ह्यातून विविध देशांमध्ये निर्यात होत असलेल्या उत्पादनांमध्ये 'फार्मास्युटिकल्स'मधील व्हॅक्सीन, औषधे, ऑटोमोबाइल क्षेत्रातील कंपोनंट, स्पेअर पार्ट्स, फूड प्रोसेसिंग क्षेत्रातील विविध पदार्थ, विविध प्रकारच्या मशिनरी यांची निर्यात सर्वाधिक होत असल्याचे उद्योग विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट होते.

### निर्यातीचा तपशील

देशाच्या तुलनेत महाराष्ट्रातून होणारी एकूण निर्यात : १७ टक्के
महाराष्ट्राच्या निर्यातीतील पुणे विभागाचा वाटा : २३ टक्के
पुणे विभागाच्या तुलनेत पुणे जिल्ह्यातून होणारी निर्यात : ८० टक्के
महाराष्ट्राच्या तुलनेत पुणे जिल्ह्याचा निर्यातीचा वाटा : २१ टक्के

# महाराष्ट्र क्रांती सेना पक्ष लोकसभा निवडणुकीत चार जागा लढविणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूरः महाराष्ट्र क्रांती सेना पक्षाने आगामी लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पक्षाचे संस्थापक सुरेशदादा पाटील यांनी दिली. महाराष्ट्र क्रांती सेना पक्षाच्या वतीने रायगड, जळगाव, सिंधुदुर्ग-रत्नागिरी आणि हातकणंगले लोकसभा या चार जागा लढविण्यात येणार आहेत. बुधवारी (१३ मार्च) रोजी मुंबईत होणार्या राज्य कार्यकारणीच्या बैठकीत उमेदवारांची घोषणा केली जाणार आहे.

सुरेश पाटील यांनी सांगितले की, राजकारणात सातत्याने होत असलेली स्थित्यंतरे आणि राजकीय अराजकता यामुळे मागील काही वर्षांपासून महाराष्ट्रातील राजकारण ढवळून निघालेले आहे. प्रत्येक मतदारसंघात विद्यमान लोकप्रतिनिधींनी केलेली कामे याची माहिती घेऊन निर्माण झालेली राजकीय परिस्थिती पाहता महाराष्ट्र क्रांती सेना पक्षाने लोकसभा निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या महाराष्ट्राचे चित्र अत्यंत विदारक झाल्याचे दिसत आहे. जर महाराष्ट्रात खर्या अर्थाने क्रांती करायची असेल तर नव्या दमाच्या लोकांना संधी दिली गेली पाहिजे. तरच महाराष्ट्रात खर्या अर्थाने शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्राचा विकास होईल. हाच विकासाचा मुद्दा घेऊन महाराष्ट्राला विकासाच्या उंचीवर नेण्यासाठी नवीन कार्यकर्त्यांना लोकसभा निवडणूकीत संधी दिली जाणार आहे.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग, हातकणंगले, जळगाव आणि रायगड या चारही लोकसभा मतदारसंघांमध्ये महाराष्ट्र क्रांती सेनेला अत्यंत चांगला प्रतिसाद असून महाराष्ट्र क्रांती सेनेची ताकत ही निर्णायक ठरणारी आहे. या चारही मतदारसंघात पाणी, नोकरी, शिक्षण आणि आरोग्य हे महत्वाचे प्रश्न सातत्याने भेडसावत आहे. ते प्रश्न सुटणे गरजेचे असताना मागील अनेक वर्षापासून ते प्रलंबितच आहेत. हे प्रश्न सोडवून मतदारसंघांचा विकासाच्या माध्यमातून कायापालट करण्यासाठी महाराष्ट्र क्रांती सेना पक्ष निवडणूक रिंगणात उतरत असल्याचे सुरेशदादा पाटील यांनी सांगितले. या संदर्भात बुधवार १३ मार्च रोजी मुंबई येथे महाराष्ट्र क्रांती सेना पक्षाची राज्य कार्यकारणीची बैठक होत आहे. या बैठकीत याची अधिकृत घोषणा आणि उमेदवारांची नांवे जाहीर केली जाणार आहेत, अशी माहिती सुरेशदादा पाटील यांनी दिली.

# पुण्यात कार्यक्रम पालिकेचा, पण चर्चा मिसेस पवारांच्या 'त्या' बॅनरची

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आज पुणे दौरा असून शहरात विविध कामांचं लोकार्पण आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. यासाठी पहिला कार्यक्रम पुण्यातल्या वारजे भागात पार पडला. या कार्यक्रमासाठी खासदार सुप्रिया सुळे देखील उपस्थित होत्या. दरम्यान, हा पुणे प्रशासनाचा कार्यक्रम असून कार्यकर्त्यांनी मोठी बॅनरबाजी केली होती. दरम्यान, या कार्यक्रमासाठी लागलेल्या बॅनरमध्ये एका बॅनरची चर्चा ही सर्वाधिक होऊ लागलेली आहे. ते म्हणजे सुनेत्रा पवार यांचं बॅनर. पालिका प्रशासनाचा कार्यक्रम सुनेत्रा पवार यांचे बॅनर कार्यकर्त्यांनी लावले होते. परंतु प्रत्यक्षात सुनेत्रा पवार या कार्यक्रमसाठी अनुपस्थित होत्या.

देशाचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात, यावर्षी प्रथमच नणंद विरुद्ध भावजाय अशी घरातच लढत असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे. काल शरद पवार यांनी सुप्रिया सुळे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. तसेच, सुनेत्रा पवार यांचं बॅनर आणि दौऱ्यामुळे त्यांच्या नावाचीही चर्चा आहे. म्हणून येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय विरोधक म्हणून बॅनर बाजी केली आहे का?




असा प्रश्न उपस्थित झाला.

या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, मंत्री चंद्रकांत पाटील आमदार भीमराव अण्णा तपकीर, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. पुण्यात आज महाराष्ट्र सरकारच्या वतीने विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात प्रथमच सुनेत्रा पवार यांचे मोठमोठे होर्डिंग लावण्यात आलेले आहेत. या कार्यक्रमात सुनेत्रा पवारही व्यासपीठावर दिसणार का, अशी चर्चा होती. मात्र त्या कार्यक्रमात उपस्थित राहिल्या नाहीत. तरी चर्चा मात्र त्यांच्याच बॅनरची होती.

# दोन हजारचे आमिष दाखवून विविध बँकेतून कर्ज उचलले, अल्पशिक्षित महिलेने ४०० जणींना फसविले

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : दोन हजार रुपये देण्याचे आमिष दाखवून सुनिता कृष्णात पाटील (वय ४५, रा. कुरुकली, ता. करवीर) या अल्पशिक्षित महिलेने गावातील सुमारे ४०० महिलांच्या नावे विविध बँकांमधून कर्ज उचलले. कर्जाचे हप्ते थकल्याने बँकांनी महिलांकडे तगादा लावल्याने हा प्रकार समोर आला. याबाबत महिलांनी शनिवारी (दि. ९) करवीर पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दिला. २०१९ मध्ये फसवणुकीचा प्रकार घडला.

याबाबत अधिक माहिती अशी की, कुरुकली येथील सुनिता पाटील या महिलेने कोरोना काळात गावातील काही महिलांचे गट स्थापन केले. प्रत्येकी दोन हजार रुपये देण्याचे आमिष दाखवून त्यांचे आधार कार्ड, बँकेचे पासबूक, रेशन कार्डच्या झेरॉक्स आणि फोटो घेतले. या कागदपत्रांच्या आधारे जिल्हा बँकेसह अन्य खासगी बँका आणि फायनान्स कंपन्यांकडून प्रत्येक महिलेच्या नावावर ३० ते ५० हजार रुपये कर्जाची उचल केली. सुरुवातीचे काही महिने हप्ते भरले. यामुळे कागदपत्र देणा-या महिलांची संख्या वाढली. मात्र, कर्जाचे हप्ते थकल्यामुळे गेल्या वर्षभरापासून बँकांची वसुली पथके दारात येऊ लागल्याने महिलांचे धाबे दणाणले.

याबाबत महिलांनी स्मिता पाटील हिच्याकडे चौकशी करून कर्जाचे हप्ते भरण्याची विनंती केली. मात्र, तिने हात झटकल्यामुळे फसवणूक झालेल्या महिलांनी पोलिस ठाण्यात धाव घेतली. फसवणुकीची रक्कम एक कोटीपेक्षा जास्त असेल, असा अंदाज महिलांनी वर्तवला.

फसवणूक करणा-या संशयित महिलेचे शिक्षण फक्त सातवीपर्यंत झाले आहे. महिलांचे कागदपत्र गोळा करणे आणि बँकांमधून कर्ज घेण्याच्या कामात तिला कोणीतरी मदत केली असावी, असा पोलिसांना संशय आहे. त्यामुळे या प्रकरणामागील



मास्टरमाईंड कोण? याची चर्चा परिसरात रंगली आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायक्षेत्र)

# भारत जोडो न्याय यात्रेची शिवाजी पार्कवरील सभा ऐतिहासिक होईल

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई - भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोपाची सभा शिवाजी पार्कवर होत असून या सभेची तयारी सुरु आहे. इंडिया आघाडीच्या या सभेसाठी काँग्रेस पक्षाने समन्वय समिती स्थापन केली आहे. राहुल गांधी यांचे मुंबईत भव्य स्वागत करण्याबरोबरच शिवाजी पार्कवरील सभाही ऐतिहासिक करण्यासाठी काँग्रेस पक्ष सज्ज आहे, अशी माहिती सभेच्या समन्वय समितीचे सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान यांनी दिली आहे.



शिवाजी पार्कवर होणाऱ्या इंडिया आघाडीच्या सभेसंदर्भात चर्चा करण्यासाठी काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे आज कोकण विभागातील जिल्हाध्यक्ष व प्रदेश पदाधिका-यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर माहिती देताना नसीम खान म्हणाले की, शिवाजी पार्कवर होणारी सभा व राहुलजी गांधी यांच्या मुंबईतील स्वागतासंदर्भात यावेळी चर्चा झाली. भारत जोडो न्याय यात्रेचा समारोप मुंबईत होत आहे व मुंबईतील सभेतूनच इंडिया आघाडीच्या लोकसभा निवडणुक प्रचाराचा नारळ फोडला जाणार आहे. इंडिया आघाडीतील सर्व मित्र पक्षांचे प्रमुख नेते या सभेला उपस्थित राहणार आहेत. राहुलजी गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला महाराष्ट्राने अभूतपूर्व प्रतिसाद दिला होता. आता न्याय यात्रा व शिवाजी पार्कवरील सभेलासुद्धा प्रचंड जनसमर्थन मिळेल असा विश्वास नसीम खान यांनी व्यक्त केला आहे.

आजच्या या बैठकीला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सदस्य व खासदार चंद्रकांत हंडोरे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव व सहप्रभारी सोनल पटेल, आशिष दुआ, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, कोषाध्यक्ष डॉ. अमरजित मनहास, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे, राजेश शर्मा, राजन भोसले, मुझ्झफर हुसेन, जोजो थॉमस, ब्रिज दत्त, भावना जैन, श्रीरंग बरगे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाहू महाराज छत्रपतींविरोधात भाजपची मोठी खेळी

## समरजीत घाटगेंना उमेदवारी देण्याची मागणी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : आगामी लोकसभा निवडणुकीसाठी कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांना उमेदवारी देत महाविकास आघाडीने महायुतीसमोर मोठं आव्हान निर्माण केलं आहे. महविकास आघाडीने छत्रपती घराण्यात उमेदवारी दिल्याने महायुतीने देखील नवीन खेळी खेळली आहे. शाहू महाराजांविरोधात भाजप नेते समरजीत घाटगेंना उमेदवारी देत नवीन रणनीती आखल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे जरी कोल्हापूरची जागा शिवसेनेला गेली तरीही समरजीत सिंह घाटगे यांना शिवसेनेतून उमेदवारी दिली जाऊ शकते आणि त्यासाठी घाटगे तयार होतील अशी शक्यता आहे.

विद्यमान खासदार संजय मंडलिक यांच्याबद्दल मतदारसंघात असलेल्या नाराजीमुळे त्यांचे तिकीट कापले जाईल अशी चर्चा मागील अनेक दिवसांपासून सुरू होती. सध्या एकीकडे मंडलिक आपणच पुन्हा उमेदवार असल्याचं सांगत असले, तरी दुसरीकडे मात्र कोल्हापूरच्या जागेबाबत वरिष्ठ पातळीवर अनेकांनी समरजित घाटगे यांच्या नावाला पसंती दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे जागावाटपात ही सीट कोणाला जाणार यावर समरजीत घाटगे कोणत्या चिन्हावरून निवडणूक लढवणार हे ठरवण्यात येणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात जागावाटपावरून भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या महायुतीत मोठा पेच निर्माण झाला आहे. जागावाटप अद्याप निश्चित झाले नसले तरी भाजप जास्तीत जास्त जागा लढवण्यावर ठाम आहे. यामुळे मित्रपक्षातून नाराजीचे सूर उमटत असून दिल्ली दरबारी बैठकांचं सत्र सुरू आहेत. या बैठकीत कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाबाबत देखील चर्चा झाली असल्याची माहिती मिळत आहे.

भाजपाकडून कोल्हापूर लोकसभा मतदारसंघ आपल्या ताब्यात घेऊन येथे उमेदवार बदलण्याच्या हालचाली जोरात सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. महाविकास आघाडीने कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील छत्रपती घराण्यातून शाहू महाराजांना उमेदवारी देत मास्टरस्ट्रोक मारला आहे. छत्रपती घराण्यातील उमेदवार उभा केल्याने महायुती समोर तगडं आव्हान निर्माण झाले आहे. यामुळे भाजप आता छत्रपती घराण्याला तोडीस तोड उमेदवार देण्याच्या तयारीत आहे. या ठिकाणी शाहू महाराजांच्या विरोधात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जनक घराण्यातील कागलमधील समरजीतसिंह घाटगे यांना उमेदवारी देऊन एक नवीन रणनीती महायुती आखत आहे.

कोल्हापूर लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार शिवसेना शिंदे गटाचे संजय मंडलिक आहेत. शिवसेनेमध्ये झालेल्या बंडानंतर संजय मंडलिक यांनी ठाकरेंची साथ सोडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हात धरला. मात्र गेल्या पाच वर्षात संजय मंडलिक मतदारसंघात दिसलेच नाहीत असे म्हणत अनेक मतदारांनी नाराजी दर्शवली. तसेच भाजपने केलेल्या सर्वेक्षणामध्येही विद्यमान खासदाराच्या विरोधात नकारात्मक वातावरण दिसल्याने भाजप येथे उमेदवार बदलाच्या हालचाली करत आहे.

दुसरीकडे, या जागेवर शिवसेनेने दावा सांगितला असला असून या जागेवरून आपणच उमेदवार असणार असा विश्वास संजय मंडलिक यांनी व्यक्त केला आहे. मात्र भाजप ही जागा आपल्या ताब्यात घेऊन या जागेवरून समरजीतसिंह घाटगे यांना उमेदवारी देणार असल्याच्या चर्चा सध्या सुरू आहेत. केंद्रीय पातळीवर समरजीत सिंह घाटगे यांच्या नावाला पसंती मिळत असून येत्या दोन ते तीन दिवसात महायुतीकडून जागावाटप आणि उमेदवार जाहीर करण्यात येणार आहेत. दरम्यान या संदर्भात समरजित सिंह घाटगेंनी यावर प्रतिक्रिया देणं टाळले असून आपण भाजपचा प्रोटोकॉल पाळणारा व्यक्ती असल्याचे म्हणत सध्या त्यांनी या विषयावर मौन बाळगले आहे.

# बर्ड फ्ल्यू प्रतिबंध व नियंत्रणासाठी नागरिकांनी दक्षता घ्यावी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : नागपुर जिल्हयात बर्ड फ्लु आजाराची लागण पक्षामध्ये झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे बर्ड फ्लु प्रतिबंध व नियंत्रणासाठी नागरीकांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. संक्रमित पक्ष्यांच्या लाळ, श्लेष्मल आणि विष्ठेमध्ये एव्हियन फ्लूचे विषाणू असतात. जेव्हा एखादी व्यक्ती विषाणू असलेल्या पृष्ठभागाला स्पर्श करते, नंतर त्यांच्या डोळ्यांना, नाकाला किंवा तोंडाला स्पर्श करतो तेव्हा एव्हियन फ्लूच्या विषाणूशी मानवांचा संपर्क होऊ शकतो. यासाठी नागरीकांनी काळजी घ्यावी. पक्षी स्त्रावा सोबत संपर्क टाळावा, पक्षी, कोंबडया यांचे पिंजरे आणि ज्या भांडयात त्यांना रोज खाणे दिले जाते अशी भांडी रोज डिटर्जंट पावडरने धुवावीत. शिल्लक मासांची योग्य विल्हेवाट लावावी, एखादा पक्षी मरण पावला तर अशा पक्षांना उघडया हाताने स्पर्श करु नका. जिल्हा तसेच विभागीय नियंत्रण कक्षास ताबडतोब कळवा. कच्च्या पोल्ट्री उत्पादनासोबत काम करताना हात पाणी व साबणाने वारंवार स्वच्छ धुवावेत. व्यक्तिगत स्वच्छता राखावी. पक्षांचा परिसर स्वच्छ ठेवावा, कच्चे चिकन / चिकन उत्पादनासोबत काम करताना मास्क आणि ग्लोव्हजचा वापर करावा, पूर्ण शिजवलेल्या ( १०० डिग्री सेल्सीअस) मांसांचाच खाण्यामध्ये वापर करावा, आपल्या गल्लीत अथवा परिसरात तलाव असेल आणि त्या तलावात पक्षी येत असतील तर या ठिकाणी सुयोग्य प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी वन विभाग / पशुसंवर्धन विभागास कळविण्यात यावे असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. नागरीकांनी दक्षता म्हणून कच्चे चिकन / कच्ची अंडी खाऊ नयेत. अर्धवट शिजलेले चिकन / पक्षी, अर्धवट उकडलेली अंडी खाऊ नयेत. आजारी दिसणाऱ्या, सुस्त पडलेल्या पक्षांच्या संपर्कात येऊ नये. पूर्णपणे शिजलेले मांस आणि कच्चे मांस एकत्र ठेऊ नये अशा सूचना आरोग्य विभागा मार्फत करण्यात आल्या आहेत.



# महाबळेश्वरात अनधिकृत बांधकामांवर हातोडा; रविवारी पहाटे ६ वाजताच कारवाईला सुरुवात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा -महाबळेश्वर येथील अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करा अशी मागणी सातत्याने होत होती. त्यानुसार रविवारी दि.१० मार्च रोजी पहाटे प्रशासनाने येथील अनाधिकृत बांधकामांवर हातोडा टाकला आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली या अनधिकृत बांधकामांवर हातोडा टाकण्यात आला आहे. रविवारी पहाटे ६ वाजता ही कारवाई करण्यात आली आहे.

कारवाईत प्रांताधिकारी राजेंद्र जाधव,तहसिलदार तेजिस्विनी पाटील व सर्व प्रशासकीय विभिगाचे अधिकारी ,कर्मचारी यांच्या सहभाग आहे.या कारवाईनेअनाधिकृत बांधकाम असणाऱ्या व्यक्तींचे धाबे दणाणले आहेत. गुरेघर परिसरात ही कारवाई सुरू असून सकाळी आठ वाजेपर्यंत दोन हॉटेल व एक मोठा बंगला अशा तीन इमारती जमीन दोस्त करण्यात आल्या आहेत.

# साईदर्शन सोसायटीचा कणा असणाऱ्या महिलांचा सन्मान

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : जसजसा महिला दिन जवळ येतो आहे तसे सोनी सबवरील वागले की दुनिया- नई पीढी नए किस्से' ही मालिका साई दर्शन सोसायटीचा कणा असलेल्या महिलांसाठी एका विशेष उत्सवाची तयारी करत आहे. या प्रसंगी, मुलांनी आपल्या वडिलांच्या साथीने त्यांच्या सोसायटीतील विलक्षण स्त्रियांना सन्मानित करण्यासाठी एक अनोखा पुरस्कार सोहळा आयोजित केला. सोसायटीमधील महिला या स्पर्धेत भाग घेण्यासाठी आणि आपल्यातील सर्वोत्तम गुण प्रदर्शित करण्यासाठी उत्सुक आहेत.

स्कोअरिंग सिस्टमप्रमाणे चांगल्या कृत्यांसाठी गुण मिळणार आहेत तर कोणत्याही चुकांसाठी गुण वजा केले जाणार आहेत. तर, महिला दिनाच्या निमित्ताने सोसायटीतील महिलांना पुरस्कार सोहळ्यात एक सुखद सरप्राइज मिळणार आहे. स्पर्धात्मक वातावरणाऐवजी, कार्यक्रमाचे रूपांतर एकतेच्या, प्रेमाच्या आणि उपस्थित सर्व महिलांच्या कौतुकाच्या उत्सवात झाले. राधिका(भारती आचरेकर) या सगळ्यात जुन्या सदस्यापासून ते किट्टू(माही सोनी) या सगळ्यात छोट्या सदस्यापर्यंत, प्रत्येक महिलेचे कौतुक करण्यात आले आणि त्यांच्या विलक्षण गुणांसाठी तसेच कुटुंब आणि समाजातील योगदानासाठी त्यांना पुरस्कृत करण्यात आले. वागले की दुनिया' मालिकेतील हा अनोखा उत्सव म्हणजे आपले जीवन समृद्ध करणाऱ्या महिलांना ओळखून त्यांचा सन्मान करण्याचे महत्त्व जाणवून देणारा सोहळा ठरला.

वंदनाची व्यक्तिरेखा साकारणारी परिवा प्रणती म्हणाली,वागले की दुनिया ही मालिका नेहमीच समाजातील उपेक्षित नायकांना प्रकाशात आणते आणि महिला दिन साजरा करणारे हे नविनतम कथानक त्याला अपवाद नाही.

# भंगार डेमू प्रवाशांच्या सेवेत; वीजपुरवठा बंद झाल्याने डब्यात अंधार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : कोल्हापूर ते सांगलीदरम्यान डेमू पॅसेंजर रेल्वेचा प्रवास म्हणजे अडथळ्यांची शर्यत ठरत आहे. शनिवारी सायंकाळी पॅसेंजरमधील दिवे बंद पडल्याने प्रवाशांना अंधाऱ्या डब्यांतून प्रवास करावा लागला. रेल्वे अधिकाऱ्यांना प्रवाशांनी धारेवर धरल्यानंतर अधिकाऱ्यांनी खटपट करुन डब्यांमध्ये वीजपुरवठा सुरळीत केला.



सातारा ते कोल्हापूर-सातारादरम्यान सकाळी व सायंकाळी धावणाऱ्या पॅसेंजर रेल्वेबाबत प्रशासनाची अनास्था संताप आणणारी आहे. डेमूच्या डब्यांमध्ये अस्वच्छता, गाडी विलंबाने धावणे हे प्रकार रोजचेच आहेत. गेल्या काही महिन्यांत डेमू गाडीच्या नादुरुस्त्यांमुळे प्रवाशांची डोकेदुखी वाढली आहे.

शनिवारी सायंकाळी पावणेसात वाजता कोल्हापुरातून सुटलेली सांगली पॅसेंजर रुकडीमध्ये येताच अंधारात बुडून गेली. डब्यांतील वीजपुरवठा बंद झाला. सर्व दिवे आणि पंखे बंद पडले. प्रवाशांनी मोबाईलच्या बॅटऱ्या सुरु करुन उजेडाचा प्रयत्न केला. यादरम्यान, महिला प्रवाशांना चोरीमारीपासून सावध राहण्याची वेळ आली.

पुढील स्थानकात दिवे सुरु होतील या अपेक्षेने प्रवासी शांत होते, पण प्रशासनाने कोणत्याही हालचाली केल्या नाहीत. अंधारे डबे तसेच धावत राहिले. हातकणंगले स्थानकात कोयना एक्सप्रेसच्या क्रॉसिंगसाठी डेमू थांबली. त्यावेळी प्रवाशांच्या संतापाचा उद्रेक झाला. त्यांनी अधीक्षकांना धारेवर धरले. त्यानंतर रेल्वे कर्मचारी पाठवून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. सर्व डबे प्रकाशमान झाले.

प्रवाशांनी सांगितले की, लाल डेमूचे इंजिन सतत नादुरुस्त होते. सकाळी धावणारी सातारा-कोल्हापूर पॅसेंजर हजारो प्रवाशांसाठी महत्वाची आहे. सातारा, सांगली, मिरज, जयसिंगपुरातून मोठ्या संख्येने विद्यार्थी, नोकरदार कोल्हापूरला जातात. ही गाडी सकाळी ९.५० वाजता कोल्हापुरात पोहोचण्याची वेळ आहे. पण इंजिनातील बिघाडामुळे सातत्याने विलंबाने धावते. पंधरवड्यापूर्वी तर चक्क बारा वाजता पोहोचली होती. बिघाडामुळे तिची गती मंदावली होती. ताशी २०-३० किलोमीटर या गडीने डेमू धावत होती. या गाडीने प्रवाशांच्या सहनशीलतेची परीक्षा पाहिली.

रेल्वेने कोरोनाकाळात वाढवलेले तिकीटांचे दर नुकतेच पूर्ववत केले. मिरज ते कोल्हापूर हे ३० रुपये प्रवासभाडे पुन्हा १५ रुपयांवर आणले. रेल्वेने प्रसंगी भाडे वाढवले तरी चालेल, पण सेवा चांगली द्यावी अशी प्रवाशांची भावना आहे.

# वंशाच्या दिव्याने जन्मदात्यालाचा मरणाच्या वाटेवर सोडले, मायेचा पाझर फुटून मुलीने आपलेसे केले!

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली: वंशाचा दिवा म्हणून मुलग्याचे कोडकौतुक केले, पण बापाच्या म्हातारपणी मुलाने त्याला मरणाच्या वाटेवर बेवारस सोडून दिले. बापाच्या मरणयातनांची माहिती मिळताच लेक धावत आली. बापाला घेऊन गेली.



मिरजेतील एका वृद्धाची ही करुण कहाणी. आजारपणामुळे ते मिरजेतील शासकीय रुग्णालयात बरेच दिवस उपचार घेत होते. डिस्चार्ज मिळाल्यानंतर त्यांची जबाबदार घेण्यास कोणीच पुढे येईना. सहा-सात महिन्यांपूर्वी बेवारस म्हणून सांगलीत महापालिका व इन्साफ फाउंडेशनच्या सावली बेघर निवारा केंद्रात दाखल झाले. केंद्राच्या व्यवस्थापनाने त्यांची काळजी घेतली. अन्नपाणी व औषधोपचार दिले.

यादरम्यान, त्यांच्या नातेवाईकांचा शोध सुरु होता. ८ मार्चरोजी समाजमाध्यमांतून त्यांच्या मुलीचा संपर्क झाला. ती विधवा होती. बाप बेवारस म्हणून सावली केंद्रात राहत असल्याची माहिती मिळताच, ती धावत आली. वडिलांना जवळ केले. भाऊ वडिलांना सांभाळत नसल्याचे सांगितले. मुलाच्या निष्ठुरपणाची कहाणी ऐकून व्यवस्थापक मुस्तफा मुजावर सुन्न झाले. महिला दिनी मुलीने एका मुलीचे कर्तव्य निभावण्याचा मोठेपणा दाखविला. महिला दिनाचा खराच अर्थ सांगितला. महापालिका आयुक्त सुनील पवार, उपायुक्त स्मृती पाटील, ज्योती सरवदे यांच्या पुढाकाराने बापाला मुलीच्या रुपाने हक्काचा आश्रय मिळाला. सावली केंद्राचे रफीक मुजावर, रेखा मद्रासी आदी यावेळी उपस्थित होते.

# पांडुरंग पाटील यांचे निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी : आटपाडी येथील कष्टाळू शेतकरी, शांत, संयमी, मितभाषी व्यक्तीमत्व पांडुरंग बापूराव पाटील यांचे आज वयाच्या ५८ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्यामागे सुविद्य पत्नी, डॉक्टर मुलगा, उच्चशिक्षित मुलगी, भाऊ, चुलतभाऊ भावजयी, पुतणे, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. मंगळवार दि. १२ रोजी सकाळी ८ .३० वाजता आटपाडी स्मशानभूमीत रक्षा विसर्जनाचा धार्मिक विधी होणार आहे.



पांडुरंग पाटील

# प्रेमराज कुंभारकडून अभिनंदन चार मिनिटांत चीतपट, शाहू खासबागेत घुमला शड्डू

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : मोतीबाग तालमीचा मल्ल प्रेमराज कुंभारने चौथ्या मिनिटांलाच घुटना डावावर शिरोळच्या अभिनंदन चव्हाण याला अस्मान दाखवून कुस्तींच्या इतिहासातील प्रथमच झालेल्या १४ वर्षांखालील पैलवानांच्या भव्य कुस्ती मैदानाचे अजिंक्यपद पटकावले.

कोल्हापूर जिल्हा व शहर राष्ट्रीय तालीम संघातर्फे खासबाग मैदानात पैलवान बाबा राजेमहाडिक यांच्या मदतीने शनिवारी या कुस्त्या पार पडल्या. या मैदानात राजर्षी शाहू महाराजांच्या ४५ पैलवानांच्या वंशजांनी प्रथमच उपस्थिती लावली. यावेळी मैदानात दुपारपासून मुलांच्या १९३ आणि मुलींच्या २२ चटकदार कुस्त्या झाल्या. विशेष म्हणजे नेपाळचा देवा थापा आणि पंजाबचा अमित लखखा यांच्यातील चटकदार कुस्ती लक्षवेधी ठरली.

प्रथम क्रमांकाची प्रेमराज कुंभार विरुद्ध शिरोळचा अभिनंदन चव्हाण यांच्यातील लढत ७ वाजून ५७ मिनिटांनी सुरू झाली. आक्रमक अभिनंदनने पहिल्याच प्रयत्नात बाहेरची टांग लावून प्रेमराजवर कब्जा घेतला; मात्र, चपळ प्रेमराजने त्यातून सहीसलामत सुटत अभिनंदनवर ताबा मिळवत त्याच्या पोटाभोवती आपल्या हातांची पकड मजबूत केली. चौथ्या



मिनिटाला त्याने घुटना डावावर अभिनंदनला अस्मान दाखवले. मुख्य पंच संभाजी पाटील यांनी तो विजयी झाल्याचे घोषित केले.

द्वितीय क्रमांकाच्या लढतीत पैलवान नंदगावच्या संस्कार चौगले याने कुर्डूच्या अथर्व पाटीलवर पोकळ डावावर विजय मिळविला. तिसऱ्या लढतीत कोपार्डेच्या गौरव पाटीलने कसबा बावड्याचा मल्ल समर्थ पायमलला ढाक डावावर अस्मान दाखवले. चौथ्या लढतीत बहिरेश्वरच्या आर्यन सावंतने कुरुंदवाडच्या विश्वजित पाटीलवर घिस्सा डावावर विजय मिळविला. पाचव्या लढतीत क्रीडा संकुलाच्या शैलेस सासने याने लाटणे डावावर पनवेलच्या सार्थक गोंधळीला चीतपट केले. सहाव्या लढतीत क्रीडा संकुलाच्याच पार्थ गौंड याने शाहूवाडीच्या सुशील डफळेला झोळी डावावर अस्मान दाखवले.

सातव्या लढतीत आटपाडीच्या रणवीर देशमुखने गडमुडशिंगीच्या राणा देशमुखवर घिस्सा डावावर विजय मिळविला. आठव्या लढतीत वाकरेच्या समर्थ पाटीलने इचलकरंजीच्या सोहम धुमाळवर एकरी पट काढत मात केली. नवव्या लढतीत वाकरेच्या केदार पाटीलने कुंभी कासारीच्या चैतन्य पाटीलवर झोळी डावावर आणि दहाव्या लढतीत कोपार्डेच्या सर्वेश कांबळेने क्रीडा संकुलाच्या संस्कार पाटीलला घिस्सा डावावर अस्मान दाखवले. या मैदानात अभिनेत्री दीपाली सय्यद यांच्या हस्ते पैलवान बाबाराजे महाडिक यांचा सत्कार करण्यात आला. मैदानासाठी उमेश शिंदे, डॉ. रमेश जाधव, गणेश मानुगडे, गुंडा पाटील, संभाजी वरुटे, मिलिंद यादव आदी उपस्थित होते.

# अन्यथा या निवडणुकीनंतर तुम्ही जेलमध्ये गेल्याशिवाय राहणार नाही

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर: आम्ही फकीर आहोत. कधी या मस्जिदमध्ये तर कधी त्या मंदिरमध्ये असतो. आम्ही कोणतीही चोरी केली नाही ना सबसिडी खाल्ली, ना कोणते कारखाने काढले. यामुळे आम्ही ठामपणे मोदींना पाहिजे ते बोलू शकतो. महाविकास आघाडीसोबत युती व्हावी, आमची भावना आहे. मात्र एकमेकांच्या विरोधात कुरघोडी करणाऱ्या काँग्रेसवाल्यांनी सांगावं की काँग्रेसच्या अध्यक्षांवर ईडीची चौकशी आहे की नाही. त्यांच्यावर ईडीची चौकशी असल्याने ते भाजप विरोधात कोणतीही भूमिका घेत नाहीत आणि ते आम्हाला शहाणपणा सांगत आहेत की तुम्ही बीजेपीला मदत करणार म्हणत आरोप करत आहात. तुम्ही इलेक्शन लढू नका. मात्र आम्ही बीजेपीला झोपवल्याशिवाय राहणार नाही, अशी जोरदार टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. ते आज इचलकरंजीमध्ये सभेत बोलत होते.

राज्यात महाविकास आघाडी सोबत येण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे इच्छुक आहेत. मात्र जागा वाटपाचा तिढा सुटत नसल्याने प्रकाश आंबेडकर आता आक्रमक झाले आहेत. त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली असून काँग्रेसमध्ये नवीन, चांगल्या आणि जिंकून येणाऱ्या कार्यकर्त्याला उमेदवारी दिली जात नाही पण घराणेशाही पोसत राहत आहेत आणि यामुळे याचा फायदा नरेंद्र मोदी घेतात. आपल्याला लोकशाही आणायची आहे की घराणेशाही असे विचारतात. मोदी म्हणतात या देशातील जनता हेच माझं परिवार आहे. मोदीजी तुमचं म्हणणं बरोबर आहे. मात्र त्यातील एक माणूस तुम्हाला अधिक महत्त्वाचा आहे, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, निवडणूक लढवताना निवडणूक आयोगाला एक फॉर्म भरावा लागतो. त्या फॉर्ममध्ये मोदींनी माझं लग्न झालं आहे असं लिहिलं आहे. माझी बायको जिवंत आहे, असे लिहिले आहे. मग मोदीजी तुम्ही या विशेष माणसाला तुमच्यासोबत ठेवा आणि कुटुंब चालवा आणि मग आम्ही म्हणू आम्ही तुमच्या कुटुंबाचे सदस्य आहोत. मोदी हे सनातन हिंदू धर्मातील संस्कृती पाळत नाहीत. मग तुम्ही कुठल्या तोंडाने मत मागायला जाणार आहात. मोदी बोलतात एक आणि वागतात दुसरच. मी काँग्रेसच्या महिला आघाडीला एक कार्यक्रम सुचवला होता. त्यांनी मोदींच्या घरासमोर जाऊन मोदींनी आपल्या पत्नीसोबत एकत्र राहावं म्हणून धरण आंदोलन करायला सुचवलं होत. मात्र ते करू शकले नाहीत त्यांना साधं एक आंदोलन करण्याची हिम्मत नाही. ते आम्ही बीजेपी बरोबर लढलं पाहिजे, असे सांगत आहेत. मात्र काँग्रेसने आधी स्वतः लढायला सुरुवात करावी आणि मग आम्हाला उपदेश करावा, अशी टीका प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसवर केले आहे.

हा देश आणखी देखील वाचलेला आणि जुळलेला आहे. अद्याप तुटलेला नाही. सध्याचं भाजपचं सरकार हे संविधान तुडवायला निघालं आहे. ते जे चातुर्यवर्ण आणायला निघाले आहेत अशांच्या विरोधात आपल्याला लढायचं आहे. यासाठी



एक लाट निर्माण करायची तुम्हाला चांगली संधी होती. मात्र ते सोडून जे मोदींच्या विरोधात लढतात त्यांच्याबद्दल तुम्ही शंका उपस्थित करत आहात. काँग्रेसमधील एक माजी मुख्यमंत्री तुमचा गेला दुसरा राहिला आहे. त्याला सुद्धा आपल्यातील एकीमध्ये बिघाड करण्याचा अजेंडा देण्यात आलेला आहे. त्याने एकीबद्दल बिगार केली तर मे जून मध्ये कुठेतरी राज्यपाल म्हणून जाणार, अशी ऑफर देण्यात आली आहे असा गौप्यस्फोट देखील प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी केला आहे. यामुळे अशा सुपारीबाज लोकांना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी काँग्रेसमधून काढून फेकून द्यावं. म्हणजे काँग्रेस वाढायला सुरुवात होईल, अन्यथा या निवडणुकीनंतर तुम्ही जेलमध्ये गेल्याशिवाय राहणार नाही, असा सल्लाही यावेळी आंबेडकर यांनी काँग्रेसला दिला आहे.

दरम्यान प्रकाश आंबेडकर यांनी नरेंद्र मोदी आणि मोदी सरकार यांच्या कामकाजावर देखील निशाणा साधला असून मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात एअर फोर्सची वाट लावली आहे. मनमोहनसिंग यांच्या कालावधीत फ्रेंच सरकारकडून १३५ फायटर विमान विकत घ्यायची होती. मध्यंतरी बातमी आली की रशियाकडून आलेले मिग २१ आता चालणार नाही. त्यांचं आयुष्य संपलेलं आहे. एअर फोर्सच एक स्कॉर्डन सुरू करायचं असेल तर १३५ फायटर जेट तेथे लागतात. मात्र मोदींनी आणले किती ३५ मग बाकीचे १०० गेले कुठे? दहा वर्षांपूर्वी मोदींनी सांगितलं होत की अंबानी हे विमान आणून देईल. मग आता दहा वर्ष होत आले. मग मोदींनी आता पहिल्यांदा सांगावं की उरलेले शंभर विमान येणार कधी? एअर फोर्स त्याची वाट बघत आहेत. खरंतर नरेंद्र मोदी हे सैन्य दलाला खोकला करणारे पंतप्रधान आहेत. हे पूर्णपणे खोटारडं आणि लुटारूंचं सरकार आहे. तुम्ही या देशाचा संरक्षण कसं करणार, ज्यांनी या संरक्षणाचा खेळ केला आहे. त्यांना पुन्हा पंतप्रधान करता कामा नये, असेही आंबेडकर म्हणाले आहेत.

# मेंदूवर परिणाम होत नाही तोपर्यंत वय वाढल्याची चिंता करायची नाही

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

बारामती : वय वाढले हे ठीक आहे परंतु आपण जेष्ठत्वाकडे झुकलो तेव्हा कदाचित आपले पाय दुखतील, गुडघे दुखतील, दात दुखतील परंतु त्याचा आपल्या डोक्यावर परिणाम होत नाही, म्हणजेच मेंदूवर परिणाम होत नाही. हा मेंदू जोपर्यंत सशक्त आहे तोपर्यंत आपल्याला वय वाढण्याचे, चिंता करण्याचे कारण नाही, अशी फटकेबाजी खुद्द बारामतीत करून ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अप्रत्यक्षपणे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रत्युत्तर दिले. जेष्ठ नागरिक हे समाजाचा ठेवा आहेत. तो ठेवा असाच जपण्याची गरज आहे, असे भावनिक मतही त्यांनी व्यक्त केले.



निमित्त होते, बारामतीतील ज्येष्ठ नागरिक संघाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे... अनौपचारिक गप्पांसाठी शरद पवार आले होते. त्यांच्या आगमनाप्रसंगी उपस्थितांनी त्यांच्या नावाचा गजर करून त्यांना पाठिंबा दर्शवला. ज्येष्ठ नागरिकांची संख्या या कार्यक्रमाला बरीच होती.

या कार्यक्रमात शरद पवारांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात पवार म्हणाले, आता ज्येष्ठांच्या ओळीत मी पण बसतो. कारण आता माझं वय देखील ८४ झालं आहे. जेष्ठ नागरिकांचे प्रश्न जाणून घेतले पाहिजेत. ज्येष्ठ नागरिकांचा मोठा वर्ग असून देशाच्या उभारणीत त्यांचाही मोठा वाटा आहे. नव्या पिढीला ज्ञान देणारे घटक म्हणून तुमच्याकडे पाहिले जाते.

एक सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, जेव्हा मी कृषिमंत्री पदाचा पदभार स्वीकारला, तेव्हा आपण धान्य आयात करत होतो आणि जेव्हा मंत्रिपद सोडलं तेव्हा आपण जगातल्या अकरा देशांना धान्य निर्यात करत होतो. आपल्याकडे आधी कापसाच्या जिनिंग मिल होत्या. तसेच अनेक गुऱ्हाळे होती. त्यानंतर जाचक, घोलप आणि माझे वडील तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी छत्रपती कारखान्याची उभारणी केली. त्यानंतर सोमेश्वर कारखाना मुकुटराव काकडे यांनी स्थापन केला. त्यानंतर माळेगाव कारखाना सुरू झाला आणि या दरम्यानच्या काळामध्ये येथील गुऱ्हाळे गेली आणि कारखानदारी वाढीस लागली. इथून सगळे परिस्थिती बदलायला लागली फक्त परिस्थितीच बदलली नाही तर नागरिकांची क्रयशक्ती देखील वाढली.

हा बदल होत असतानाच त्याचा पूर्ण टप्पा शिक्षणाकडे वळला. सुरुवातीला फक्त एम.ई.एस संस्थेची शाखा होती. त्यानंतरच्या काळामध्ये विद्या प्रतिष्ठान शारदानगरचे कृषी विकास प्रतिष्ठान, त्यानंतर माळेगावची इंजिनिअरिंग कॉलेज, सोमेश्वरचे इंजिनिअरिंग कॉलेज सुरू झाले आणि शिक्षणाने परिस्थिती बदलली. पुण्यानंतर ज्ञानाचे केंद्र बारामती झाले. त्यानंतर आपण येथे एमआयडीसी सुरू केली. प्रक्रिया करणारे उद्योग या ठिकाणी सुरू झाले.

एक मात्र खरंय की हा काळ असा होता की समोर कोणीही आले तर त्याचे नाव माहिती असायची. आता ७५ टक्के लोक ओळखू येत नाहीत. कारण अनेक लोक इथे बाहेरून आले, त्यांनी बारामतीला आपले मानले आणि बारामतीचा लौकिक वाढवला. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात बारामतीचे योगदान मोठे आहे. माझा जन्म झाला तेव्हा स्वातंत्र्यलढा सुरू होता. माझं स्वातंत्र्य लढ्यात काही योगदान नाही पण त्या लढ्यात योगदान दिलेली खूप मोठी माणसे बारामतीची आहेत.

# प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेची टपाल विभागात नोंदणी

## कुटुंबांना अनुदान

'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजने'अंतर्गत घराच्या छतावर सोलर पॅनेल बसवणाऱ्या कुटुंबाला दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये; तर तीन किलो वॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे.

## योजनेचे निकष

- नोदणी करणाऱ्या व्यक्तीचे स्वतःचे घर व वीज जोडणी आवश्यक आहे.
- सोलर पॅनेलसाठी पुरेशी जागा असावी.
- वीजमीटर स्वतःच्या नावावर असावे.





**माणदेश एक्सप्रेस न्यूज**


मुंबई - विजेच्या बाबतीत देशातील नागरिकांना स्वयंपूर्ण बनवण्यासाठी केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना' हाती घेतली आहे. या योजनेंतर्गत घरावर सौरऊर्जा पॅनेल उभे करण्यासाठी केंद्र सरकार नागरिकांना आर्थिक सहाय्य देणार आहे. या योजनेच्या माध्यमातून घरगुती वीज निर्मितीला चालना देण्याचा सरकारचा मानस असून त्याद्वारे पर्यावरण अनुकूल वीज निर्मितीला प्रोत्साहन मिळणार आहे. 'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजने'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्वेक्षण आणि नोंदणीची जबाबदारी भारतीय डाक विभागाला देण्यात आली आहे.

डाक विभागातील पोस्टमन आणि ग्रामीण डाकसेवक घरोघरी जाऊन मोफत वीज योजनेची माहिती नागरिकांना देत आहेत. भारतीय डाक विभाग हा देशातील प्रत्येक गाव खेड्यांपर्यंत आणि प्रत्येक नागरिकांपर्यंत असल्याने या योजनेचा सर्वदूर प्रचार होण्यास मदत होणार आहे. योजनेच्या माध्यमातून अतिरिक्त उत्पन्न होणारी वीज नागरिक महावितरणला विकू शकणार आहेत. या योजनेमुळे नागरिक विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणार असून त्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधनसुद्धा उपलब्ध होणार आहे. 'प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजने'चे सर्वेक्षण डाक विभागाचे कर्मचारी घरोघरी जाऊन करणार आहेत, विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार असून नागरिकांनी नोंदणीसाठी डाक विभागाच्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कोल्हापूर-तिरुपती ही बंद झालेली विमानसेवा ३१ मार्च पासून पूर्ववत

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : कोल्हापूर-तिरुपती ही बंद झालेली विमानसेवा ३१ मार्च पासून पूर्ववत सुरू होत असल्याची घोषणा खासदार धनंजय महाडिक यांनी यावेळी केली. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दुपारी १२ वाजता ऑनलाईन पद्धतीने आझमगड येथून देशातील ३४ हजार कोटींच्या रेल्वे, महामार्ग आणि विमानतळ प्रकल्पांचे लोकार्पण आणि शीलान्यास केले.



महाडिक म्हणाले, वर्षभरात कोल्हापूरच्या विमानतळाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून देऊ अशी घोषणा करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परवानगी दिली तर दोन दिवसात या विमानतळाला राजाराम महाराज यांचे नाव मिळेल असेही त्यांनी सांगितले.

कोल्हापुरात मुख्यमंत्र्यांचे कार्यक्रम स्थळी ११.५५ वाजता आगमन झाले. त्यांना भाषणाला वेळ मिळाला नाही. तत्पूर्वी पालकमंत्री हसन मुश्रीफ, खासदार खासदार धैर्यशिल माने, खासदार संजय मंडलिक यांची भाषणे झाली.

कोल्हापुरात विमानतळावर झालेल्या कार्यक्रमास विमानतळ जिल्हाधिकारी अमोल येडगे, पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, राजेश क्षीरसागर, आमदार प्रकाश आबिटकर, आमदार प्रकाश आवाडे, आमदार राजेंद्र यड्रावकर, समरजित घाटगे, माजी आमदार चंद्रदीप नरके, अमल महाडिक यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

# सन्मानजनक जागा वाटप होईल

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : महायुतीच्या जागा वाटपासंदर्भात वेगवेगळ्या चर्चा सुरु असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांची भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. महायुतीतील जागा वाटप उद्यापर्यंत फायनल होईल, असं अजित पवार म्हणाले. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यासंदर्भात देखील त्यांनी भूमिका स्पष्ट केली. शेळके यांनी कुणाला दमदाटी केली नसल्याचं म्हणत शरद पवार यांनी केलेल्या वक्तव्यावर अजित पवार यांनी भाष्य केलं.

अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना उद्या राज्यमंत्रिमंडळाची बैठक पार पडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, प्रफुल पटेल, सुनील तटकरे यांच्यासोबत दिल्लीला जाणार आहे, असं अजित पवार म्हणाले.

लोकसभा निवडणुकीसाठी किती जागा मागितल्या हे मी जाहीर करणार नाही, असंही अजित पवार म्हणाले. आम्ही व्यवस्थितपणे जागा मागितल्या आहेत. पत्रकारांनी विचारलं जेवढ्या होत्या तितक्या मिळणार का असं विचारलं असता त्यांनी मिश्कील उत्तर दिलं.

अजित पवार म्हणाले की अरे तु आम्हाला वेडा बिडा समजतो का काय रे, असं अजित पवार म्हणाले. तिघांचा सन्मान राहील, सन्मानजनक जागा वाटप होईल, असं ते म्हणाले.

बारामतीची विरोधकांची उमेदवारी जाहीर झाली आहे त्याबद्दल विचारलं असता त्यांचं स्वागत आहे,असं अजित पवार म्हणाले. महायुतीचं महाराष्ट्रातील ४८ जागांचं वाटप झालं की आम्ही आमचे उमेदवार जाहीर करु, असं अजित पवार म्हणाले.

शिरुर मधून उमेदवार मिळत नाही का असं विचारलं असता तुम्हाला कळेल, असं अजित पवार म्हणाले. जागा वाटपाबाबत काहीचं ठरलेलं नाही हवेतल्या चर्चा सुरु आहेत, असं अजित पवार यांनी म्हटलं.

महायुतीच्या जागा वाटपासंदर्भात मुंबई आणि दिल्लीत अमित शाह यांच्या उपस्थितीत दोन बैठका पार पडल्या आहेत. अमित शाह यांच्या उपस्थितीत मुंबईतील बैठकीत तोडगा न निघाल्यानं दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत एक बैठक पार पडली होती. आता उद्या पुन्हा एकदा दिल्लीत बैठक होणार आहे.



**विटा : साळसिंगे येथे विकास कामांच्या उद्घाटनप्रसंगी माजी सभापती ब्रह्मदेव पडळकर, अनिल पाटील, पंकज दबडे व उपस्थित मान्यवर**

# साळसिंगेत ब्रम्हदेव पडळकर यांच्या हस्ते विकास कामांचे उद्‌घाटन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

विटा : साळसिंगे ता. खानापूर येथे विविध विकास कामांचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती ब्रम्हदेव पडळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये आमदार गोपीचंद पडळकर यांच्या फंडातून मंजूर झालेल्या सभामंडपाचे तर खासदार संजयकाका पाटील यांच्या फंडातून मंजूर झालेल्या अतंर्गत रस्त्याचे उद्‌घाटन ब्रम्हदेव पडळकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अनिल पाटील, पंकज दबडे, जयवंत सरगर, सरपंच सौ.छाया पवार, संदीप ठोंबरे, संतोष यादव, निलेश पाटील, विजय जानकर, राहुल मंडले, गणेश जाधव यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमच्या विमानाचे पायलट विश्वजीत कदम : विशाल पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : मी काँग्रेस पक्षाकडून लोकसभा निवडणूक लढायला तयार आहे. पण मला जर काँग्रेस पक्षाकडून तिकीट मिळाले नाही तर वेगळा विचार करण्यापेक्षा आमची थांबायची तयारी आहे, असे विशाल पाटील यांनी स्पष्ट केले. ते रविवारी पलूस तालुक्यातील बुर्ली ते सुर्यगाव या कृष्णा नदीवरील पुलाच्या भूमिपूजन सोहळ्यात बोलत होते.



विश्वजित कदम



विशाल पाटील

यावेळी विशाल पाटील यांनी सांगलीचे विद्यमान खासदार संजयकाका पाटील यांच्यावर जोरदार टीका केली. आपल्याला हिंदी बोलणारा चांगला खासदार भेटला असता तर आज जिल्ह्यातील बरेच प्रश्न संसदेत मांडले गेले असते आणि सुटले असते. मात्र, आमचा खासदार दिल्लीत जाऊन प्रश्न मांडण्यापेक्ष्या गल्लीत बसतोय आणि दररोज तासगाव-सांगली करतो.

राजा-राजा करत खांद्यावर हात टाकतो आणि दुसऱ्याचे श्रेय घेऊन घेऊन नारळ फोडतो, अशा शब्दांत विशाल पाटील यांनी संजयकाका पाटील यांना लक्ष्य केले. काँग्रेस पक्ष आज जोमाने काम करत आहे. तरुण पिढीकडे आज काँग्रेस पक्ष जातोय याचा आनंद आहे. पक्षात काही गोष्टी चांगल्यासाठी घडतायत, कारण काहींनी पदे भोगून देखील काँग्रेस पक्ष सोडला आहे. त्यामुळे आपली वाट मात्र आता मोकळी झाली आहे. त्यामुळे विश्वजित कदम यांना महाराष्ट्रचे नेतृत्व करण्याची संधी मिळेल, असेही विशाल पाटील म्हणाले.

आतापर्यंत आमची बुद्धी भ्रष्ट झाली होती. मात्र, आता आमची हौस भागली आहे. आता आम्ही ज्या विमानात बसायचा निर्णय घेतलाय त्या विमानाचे विश्वजीत पायलट आहेत. ते नेतील तिथे जाऊ, पण आज आमच्याबद्दल वेगवेगळ्या अफवा पसरवल्या जात आहेत. मात्र, वेगळा काहीतरी विचार करण्यापेक्षा आमची थांबायची तयारी आहे, असे म्हणत विशाल पाटील यांनी अप्रत्यक्षपणे अन्य पक्षात जाणार नाही, असे संकेत दिले.

# माझ्या हातात सत्ता द्या, भोंगे बंद करून दाखवू: राज ठाकरे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नाशिक : सध्याचे राजकारण म्हणजे आळवावरचे पाणी झाले आहे. कोण कोणत्या पक्षात अन् कोण कोणाबरोबर हेच समजत नाही. वरून दाखवायला वेगळे व आतून सर्वजण एकच असल्याचा टोला लगावत माझ्या हातात सत्ता द्या, मी भोंगे बंद करून दाखवतो, असे प्रतिपादन मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले. मुंबई येथील पक्षाच्या गुढीपाडवा मेळाव्यात पक्षाची भूमिका जाहीर करू, असेही ते म्हणाले.




शहरातील दादासाहेब गायकवाड सभागृहात मनसेच्या अठराव्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त शनिवारी आयोजित सभेत ठाकरे यांनी २८ मिनिटांच्या भाषणात सध्याच्या राजकारणावर प्रहार केला. यावेळी पक्षाचे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, अविनाश अभ्यंकर, अभिजित पानसरे, अमित ठाकरे, संदीप देशपांडे, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

माझ्या कडेवरती माझीच पोरं खेळवायची आहेत, इतरांची नाही. दुसऱ्याची पोरं आपल्या कडेवर घेऊन खेळवायची मला हौस नाही, असा टोला त्यांनी सध्या महाराष्ट्रातील राजकीय स्थितीवर लगावला.

राष्ट्रवादीला मी पक्ष म्हणणार नाही. राष्ट्रवादी निवडून येणाऱ्यांची मोळी आहे. शरद पवार हेच करत आले असे सांगून राज ठाकरे म्हणाले, की जरांगे-पाटील यांना मी तेव्हाच म्हणालो होतो, आरक्षणासाठी तांत्रिक अडचण आहे. सरकारच्या भूलथापांना बळी पडू नका.